# संपादकीय

**सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
**सादर करीत आहेत**

# मुनगंटीवार फुकटचे सल्ले देऊ नका

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांनी आजच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनावर संताप येईल अशी प्रतिक्रिया दिली.

सुधीर मुनगंटीवार यांनी काँग्रेस सरकारवर आगपाखड न करता शेतकऱ्यांनाच सल्ला दिला. मुनगंटीवार म्हणाले की, शेतकऱ्यांनी शांतपणे आंदोलन करावे.

वा मुनगंटीवार वा! काय सल्ला दिला आहे! गेले २० दिवस ऊस शेतकरी दर निश्चित करा, अशी मागणी करीत आहेत. तेव्हा तुम्ही काय केले? सरकार चर्चा करायला तयार नाही. तेव्हा सरकारने चर्चा करावी यासाठी तुम्ही काय केले? शेतकरी गेले आठ दिवस आंदोलन करीत होते तेव्हा भाजपाने पाठिंब्याचा एकही मोर्चा काढला नाही. असे का? शेतकऱ्यांनी चक्काजामचे आंदोलन जाहीर केले तेव्हा पत्रकबाजीत पुढे असलेल्या भाजपातर्फे तुम्ही पाठिंब्याचे एकही पत्रक काढले नाही. गृहमंत्री आर. आर. पाटील कारवाईची भाषा करीत होते, तेव्हाही तुम्ही एक शब्द विरोधात बोलला नाहीत.

ऊस शेतकरी गेला आठवडाभर शांततेने आंदोलन करीत होते. तेव्हा मुनगंटीवार तुम्ही झोपला होतात की झोपल्याचे सोंग घेतले होते? शांततेने आंदोलन केले तरी सरकार चर्चेला पुढे येत नाही. मग शेतकऱ्यांनी करायचे काय? पराजय मान्य करून आत्महत्या करायच्या का?

आज शेतकऱ्यांनी चक्काजाम आंदोलन केले तेही आधी जाहीर करून आंदोलन केले. तरीही शेतकऱ्यांवर गोळीबार होतो. दोन शेतकऱ्यांचा जीव जातो. त्यानंतरही शांत बसायचे? भाजपासारखे? विरोधी पक्ष म्हणजे पायपुसणे झाले आहे म्हणून सरकारला हा माज आला आहे.

मावळला शेतकऱ्यांवर गोळीबार झाला तेव्हा भाजपाने उशीरा का होईना, पण आंदोलन केले. त्यावेळी आंदोलन का केले? मावळ भाजपाचा मतदारसंघ आहे म्हणून ते आंदोलन झाले. ऊस शेतकरी मात्र तुमचे मतदार नाहीत म्हणून त्यांना शांत राहण्याचे सल्ले देत आहात.

ऊस शेतकऱ्यांना पाठिंब्यासाठी भाजपा रस्त्यावर उतरेल ही घोषणा मुनगंटीवार यांनी सुरुवातीलाच करायला हवी होती. मात्र व्यासपीठावर भाषणे करायची, गर्जना करून टाळ्या घ्यायच्या, चार पावलांवर पोलीस व्हॅन उभी ठेवून त्यात फोटो काढून घ्यायचे याची काहींना सवय लागली आहे. त्यात समाधान वाटत असेल तर समाधान वाटून घ्या. मुनगंटीवार म्हणतात की, शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी माझ्या कार्यकर्त्यांना या आंदोलनात सहभागी होण्यास सांगितले आहे. काहीतरी केले असे दाखवायचे असा हा प्रकार आहे. मुनगंटीवार, शेतकऱ्यांसाठी लढता येत नसेल तर निदान त्यांना फुकटचे सल्ले तरी देऊ नका.